# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ३३/२०२२ मधील</u>
# <u>निशाणी ५ वरील आदेश</u>

( पंढरीनाथ गायकवाड वगैरे वि. मोहन कामठे वगैरे )

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींविरुद्ध दावा मिळकत सि.स.नं. २२८ यांस ग्रामपंचायत मिळकत क्र. ३३४ या मिळकतीची सरकारी मोजणी होवून हद्दीच्या खुणा कायम झाल्याशिवाय प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये पुर्व बाजूमध्ये अतिक्रमण करुन सुरु केलेले बांधकाम त्वरीत थांबवावे असा तुर्तातुर्त मनाईचा हुकूम प्रतिवादींविरुद्ध करणेत यावा यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या म्हणणेनुसार, सि.स.नं. २२८ व २२२ एकमेकांलगत असून प्रतिवादी यांनी दावा मिळकत सि.स.नं. २२८ च्या पुर्व बाजूस दावा मिळकतीवर सुमारे ३५ x ३.५ इतक्या क्षेत्राचे अतिक्रमण केलेले आहे. वादीने स्वतःच्या कथनापृष्ठर्थ नि. क्र. ३ सोबत दावा मिळकतीचे मालमत्तापत्रक, गांव नमुना नं. ८, ग्रामपंचायत हिवरे यांना दिलेला दि. २२/०१/२०२२ रोजीचा तक्रारी अर्ज, पोलिस निरीक्षक, सासवड पोलिस स्टेशन यांनी दिलेले दि. २५/०१/२०२२ रोजीचे समजपत्र, नगरभुमापन कार्यालय, सासवड यांनी दिलेला नकाशा, कच्चा नकाशा, नगरभुमापन कार्यालय यांनी दिलेली तपासणी नोंदवहीची प्रत आणि दावा मिळकतीची छायाचित्रे तसेच वादीने दिलेल्या मोजणी अर्जाची प्रत व मोजणीचे पैसे भरल्याची पावती दाखल केलेली आहे.

**३.** वादीचा अर्ज, वादपत्र आणि वादीने नि. ३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रान्वये असे निदर्शनास येते की, वादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम सुरु केलेले आहे. अभिलेखाचे अवलोकनावरुन असे दिसून येते की, दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांनी वादींविरुद्ध कॅव्हेट अर्ज क्र. ८/२०२२ दि. २४/०१/२०२२ रोजी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १४८अ प्रमाणे दाखल केलेला आहे. सदर कॅव्हेट अर्जाचे अवलोकन केल्यास कॅव्हेट अर्जदार म्हणजेच

प्रतिवादी क्र. १ ने असे कथन केले आहे की, प्रतिवादीचे सि.स.नं. २२२, मालमत्ता क्र. ३३५ चे एकूण क्षेत्र ७५२ चौ.फुट असे असून सिटी सर्व्हे रेकॉर्डला नजरचुकीने सदर क्षेत्र ५५ चौ.मीटर असे नमुद झालेले आहे. त्याबाबतची दुरुस्ती कॅव्हेट अर्जदार सिटी सर्व्हे रेकॉर्डला करुन घेणार आहेत.

४. सिटी सर्व्हे क. २२२ आणि २२८ हे एकमेकांलगत आहे आणि त्यांची ताबेवहिवाट व मालकी अनुक्रमे प्रतिवादी व वादींची आहे ही बाब अविवादित आहे. परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादीचे कथन लक्षात घेता, सि.स.नं. २२२ ची पश्चिम बाजू आणि सि.स.नं. २२८ ची पुर्व बाजू असलेल्या क्षेत्रासंबंधी दोन्ही पक्षांमध्ये वाद आहे असे दिसून येते. प्रतिवादीचे म्हणणेनुसार सि.स.नं. २२२ चे क्षेत्र सिटी सर्व्हे रेकॉर्डला नमुद क्षेत्रापेक्षा जास्त आहे व प्रतिवादी त्या अनुषंगाने बांधकाम करीत आहे. याउलट, वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी वादीच्या मालकीच्या असलेल्या क्षेत्रात अतिक्रमण करुन बांधकाम करीत आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर आल्याशिवाय कोणताही निर्णय पारीत करणे न्यायसंगत होणार नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादींविरुद्ध एकतर्फा आदेश का पारीत करु नये यासाठी प्रतिवादींना कारणे दाखवा नोटीस काढण्यात यावी.

२. वादीने स्पेशल बेलिफ भत्ता किंवा अर्जंट प्रोसेस फी भरुन सदर नोटीसची बजावणी करावी.

**सही/—**
**(श्रीमती डी. एम. पाटील)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सासवड.

दिनांक : ०४/०२/२०२२
ठिकाण : सासवड

## -: C E R T I F I C A T E :-

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade 3) | : | Mrs. S. R. Kamble |
| Name of the P. O. | : | Smt. D. M. Patil, 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C., Saswad. |
| Date of Order | : | 04/02/2022 |
| Order signed by presiding officer on | : | 04/02/2022 |
| Order uploaded on | : | 04/02/2022 |